# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १०२३/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. महिपाल भिकाजी बडोले, मु. कोदामेडी, पो. बामणी/सडक, ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदिया | ग्रामसेवक, ग्राम पंचायत, कोदामेडी, ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदिया | सहा. अभियंता श्रेणी-२, पंचायत समिती, सडक/अर्जुनी, ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदिया |

**सुनावणी दिनांक :- १३.११.२०२४**

**१. उपस्थिती —**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित |

**२. व्दितीय अपील अर्ज —**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : १२.०४.२०२२

(२) व्दितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : १२.०४.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : जनमाहिती अधिकारी यांनी मुदतीच्या आत माहिती दिली नसल्यामुळे

(४) व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केली नाही.

**माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २८.०१.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २८.०१.२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : जानेवारी २०१६ ते जानेवारी २०२१

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : १४ वा वित्त आयोगाचा आलेल्या निधीचा कोणत्या कामाकरिता वापर करण्यात आला. १) अंदाजपत्रक २) नियोजनाची प्रत ३) काम पुर्णत्वाप्रमाणपत्र व मोजमाप पुस्तिकेची सत्यप्रत व व्यक्तीश: मजुरांची हजेरी नोंद वही सत्यप्रत मिळण्यात यावी.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : कोणतीही कार्यवाही केली नाही.

**३. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०३.०३.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०३.०३.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : दि. २८.०१.२०२२ रोजी माहितीचा अधिकार नमुना अ अंतर्गत माहिती न मिळाल्यामुळे

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा. अभि. श्रेणी-२, पंचायत समिती, स/अर्जुनी यांनी दि. १६.०३.२०२२ रोजी प्रथम अपिल अर्जावर सुनावणी आयोजित केली. सदर सुनावणीत अपिल अर्ज मान्य करून जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा.पं. कोदामेडी अपिलाचे निर्णय प्राप्त झाल्यापासून १० दिवसाचे आत उपलब्ध माहिती अर्जदारास परस्पर पुरवावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा, असा आदेश पारित केला.

४. **युक्तीवाद/लेखी खुलासा** —आज सुनावणीस अपिलार्थी, श्री. बडोले उपस्थित आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती स/अर्जुनी श्री. पी. एफ. बन्सोड उपस्थित आहे. परंतु जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कोदामेडी, ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदिया अनुपस्थित आहे.

५. **निष्कर्ष** — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरून आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१) जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती दिल्याबाबत तसेच प्रथम अपिल आदेशाची पूर्तता केल्याबाबतचे कोणतेही दस्ताऐवज आयोगास सादर केले नाही.

२) तसेच जनमाहिती अधिकारी यांनी सदर सुनावणीस अनुपस्थित राहण्याबाबत कोणतेही कारण कळविले नाही.

सबब , खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतरिम आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कोदामेडी, ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदिया यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २८.०१.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावा व त्याची पोहच आयोगास सादर करावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कोदामेडी, ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदिया यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०

अन्वये कार्यवाही का? करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगास सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) सदर आदेशाची प्रत तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना मिळेल याबाबतची विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी.

४) सदर प्रकरणी आयोगास कोणतीही पुर्वसूचना न देता अथवा पुर्व परवानगी न घेता जनमाहिती अधिकारी व्दितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५) सहा, दि०१/१२/२०१५ नुसार कार्यवाही करण्याचे जनमाहिती अधिकारी याचे कार्यालय प्रमुख यांना प्रस्तावित करण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १३.११.२०२४**

**प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदिया यांना उपरोक्त आदेशातील मुद्दा क्र. ४ च्या अमंलबजावणीसाठी सदर आदेशाची प्रत अग्रेषित करण्यात येत आहे.**

जावक क्रमांक 626 दिनांक 4 FEB 2025